तरुण भारत संवाद | गुरुवार, ३ ऑगस्ट २०२३

# दोडामार्ग हळबे महाविद्यालयात क्रीडा प्रशिक्षण कार्यशाळा



दोडामार्ग : कृष्णा जंगले यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना प्रा. डॉ. सुभाष सावंत. सोबत अन्य.

वार्ताहर
दोडामार्ग

मनुष्याला रोगांपासून दूर राहण्यासाठी निरोगी शरीर असणे आवश्यक आहे. एका निरोगी शरीरातूनच निरोगी मन व बुद्धीचा विकास होतो. शरीराला स्वस्थ ठेवण्यासाठी खेळाचे भरपूर महत्त्व आहे. खेळ खेळल्याने मनुष्यात धैर्य, सहनशीलता व मानवी गुणांचा विकास होतो, असे मत सिंधुदुर्ग पोलीस विभागाचे कवायत प्रशिक्षक कृष्णा जंगले यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे, कला व वाणिज्य महाविद्यालयात एक दिवशीय क्रीडा प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कृष्णा जंगले यांनी खेळांचे महत्त्व या विषयावर मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालय विकास समिती सदस्य विवेकानंद नाईक, सिंधुदुर्ग पोलीस कवायत प्रशिक्षक कृष्णा जंगले, मातोश्री राखीताई पाटकर ॲकॅडमीचे संचालक तारा पाटकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, सिंधुदुर्ग पोलीस वाहन चालक सोनिया नाईक, कनिष्का धुरी, जिमखाना विभाग प्रमुख डॉ. संजय खडपकर, प्रा. प्रियांका गवस व इतर सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी बहुसंख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

नाईक यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. डॉ. संजय खडपकर यांनी कार्यशाळेचे प्रास्ताविक केले. डिंपल राजपुरोहित हिने सूत्रसंचालन केले, तर वैष्णवी कदम हिने आभार मानले.

Scanned with ACE Scanner